Annexure-VII

**प्रकल्प प्रवर्तक कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, सांगली, महाराष्ट्र यांनी प्रस्तावित केलेल्या टेंभू उपसा सिंचन प्रकल्पाचे विस्तारीकरण, जिल्हा सांगली, सातारा व सोलापूर, महाराष्ट्र ( १०९ गावे ) यामध्ये सांगली जिल्हयातील खानापूर तालुक्यातील १५ गांवे, तासगांव तालुक्यातील १३ गांवे, आटपाडी तालुक्यातील १३ गांवे, कवठे-महांकाळ तालुक्यातील ८ गांवे आणि जत तालुक्यातील ४ गांवे अशा एकूण ५३ गावांना सदरील सिंचनाचा लाभ देण्यासाठीच्या उपसा सिंचन योजना प्रकल्पाच्या जाहीर लोकसुनावणीचे इतिवृतांत.**

---

प्रकल्प प्रवर्तक कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, सांगली, महाराष्ट्र यांनी प्रस्तावित केलेल्या टेंभू उपसा सिंचन प्रकल्पाचे विस्तारीकरण, जिल्हा सांगली, सातारा व सोलापूर, महाराष्ट्र ( १०९ गावे ) यामध्ये सांगली जिल्हयातील खानापूर तालुक्यातील १५ गांवे, तासगांव तालुक्यातील १३ गांवे, आटपाडी तालुक्यातील १३ गांवे, कवठे-महांकाळ तालुक्यातील ८ गांवे आणि जत तालुक्यातील ४ गांवे अशा एकूण ५३ गावांना सदरील सिंचनाचा लाभ देण्यासाठीच्या उपसा सिंचन योजना प्रकल्पा बाबतची जाहीर लोकसुनावणी बुधवार, दिनांक २१ फेब्रुवारी, २०२४ रोजी दुपारी ११.०० वाजता सभागृह, विटा पंचायत समिती, विटा, ता.खानापूर, जि. सांगली, महाराष्ट्र, येथे घेण्यात आली.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचेकडील कार्यालयीन आदेश क्रं. ई.९ / २०२ ,व्दारा पत्र क्रं .बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२३०४२-एफटीएस-०२२, दिनांक २६-०४-२०२३ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली त्यानुसार सुनावणीस खालील प्रमाणे उपस्थिती होती.

१) मा. डॉ. राजा दयानिधी, - **अध्यक्ष**
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, सांगली.

२) मा. श्री. जगन्नाथ शं. साळुंखे, - **सदस्य**
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर.

३) मा. श्री. नवनाथ सं. अवताडे, - **आयोजक**
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली.

श्री. नवनाथ एस.अवताडे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी डॉ. राजा दयानिधी, जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, सांगली तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री जगन्नाथ साळुंखे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण

विषयक कार्यरत सेवाभावी संस्था, विविध चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या नागरीकांचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक ०१ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

प्रकल्प प्रवर्तक कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, सांगली, महाराष्ट्र यांनी प्रस्तावित केलेल्या टेंभू उपसा सिंचन प्रकल्पाचे विस्तारीकरण, जिल्हा सांगली, सातारा व सोलापूर, महाराष्ट्र ( १०९ गावे ) यामध्ये सांगली जिल्हयातील खानापूर तालुक्यातील १५ गांवे, तासगांव तालुक्यातील १३ गांवे, आटपाडी तालुक्यातील १३ गांवे, कवठे-महांकाळ तालुक्यातील ८ गांवे आणि जत तालुक्यातील ४ गांवे अशा एकूण ५३ गावांना सदरील सिंचनाचा लाभ देण्यासाठीच्या उपसा सिंचन योजना प्रकल्पा बाबतची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाला होता त्यानुसार पर्यावरण, वने, व हवामान बदल, भारत सरकार नवी दिल्ली यांच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना २००६ आणि सुधारित अधिसूचने नुसार संवर्ग १ (सी) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक असल्याने आजच्या सुनावणीचे आयोजन करण्यांत आलेले आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी सदरहू प्रकल्पास मंत्रालय पर्यावरण, वने व हवामान बदल, भारत सरकार नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक ०९ ऑगस्ट २०२३ रोजी सादर केला व त्यास अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक २ नोव्हेंबर २०२३ रोजी प्रदान केली आहे.

मा. जिल्हाधिकारी, सांगली यांनी सदरची जनसुनावणी बुधवार दिनांक २१ फेब्रुवारी, २०२४ रोजी दुपारी ११.०० वाजता घेणे बाबत मान्यता दिल्यानंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना

२००६ व सुधारित अधिसुचना २००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई .२९ / २०२ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२३०४२- एफटीएस ०२२ दिनांक २६-०४-२०२३ अन्वये पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली.

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक कार्यालय ,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ , सांगली यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक "दैनिक सकाळ" मध्ये मराठी व राष्ट्रीय वृत्तपत्र "टाईम्स ऑफ इंडिया" मध्ये इंग्रजी भाषेमध्ये जनसुनावणी बाबत जाहिर सूचना दिनांक १९-०१-२०२४ रोजी प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तऐवज लोकांच्या माहिती व अभ्यासाकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली.
२. जिल्हा उदयोग केंद्र, उदयोगभवन, सांगली.
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली.
४. झोनल कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यू सेक्रेटरीयाट बिल्डींग,तळमजला इस्ट विंग,सिव्हील लाईन नागपुर-४४०००१.
५. उप सचिव,पर्यावरण विभाग,नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला,मादाम कामा मार्ग,मंत्रालय, मुंबई - ३२.
६. मा. सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ, (मुख्यालय), कल्पतरू पॉईंट, तिसरा मजला, सिनेप्लॅनेट समोर, सायन सर्कल, सायन पूर्व, मुंबई.
७. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, उदयोग भवन, कोल्हापूर.
८. तहसिल कार्यालय, खानापूर, ता. खानापूर, जि.सांगली,
९. तहसिल कार्यालय, तासगाव, ता. तासगाव, जि.सांगली,
१०. तहसिल कार्यालय, कवठे महांकाळ, ता. कवठे महांकाळ, जि.सांगली,
११. तहसिल कार्यालय, जत, ता. जत, जि.सांगली,
१२. तहसिल कार्यालय, आटपाडी, ता. आटपाडी, जि.सांगली,
१३. तासगांव तालुक्यातील ग्रामपंचायत कचरेवाडी, बिरणवाडी, दहिवाडी, वाईफळे, यमगरवाडी, धोंडगेवाडी, डोंगरसोनी, किंदारवाडी, लोकरेवाडी, नरसेवाडी, सावळज, विजयनगर, वडगांव, जि.सांगली.
१४. आटपाडी तालुक्यातील ग्रामपंचायत आंबेवाडी, बोंबेवाडी, गुलेवाडी, कालेवाडी, खंजोदवाडी, लिंगीवरे, पडळकरवाडी, पंधारेवाडी, पिंपरी खालसा, पुजारवाडी (दिघंची), राजेवाडी, उंबरगांव, विभुतवाडी, जि.सांगली.
१५. कवठे महांकाळ तालुक्यातील ग्रामपंचायत गरजेवाडी, कुंदलापूर, रायवाडी, जखापूर, जयगव्हाण, करेवाडी, लोणारवाडी, शेळकेवाडी, जि.सांगली.

१६. जत तालुक्यातील ग्रामपंचायत, बेवनूर, वालेखिंडी, नवलवाडी, सिंगणहल्ली, जि.सांगली.

आयोजक, यांनी आजपर्यंत सदरील प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी ,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली यांचेकडे कोणत्याही लेखी सूचना/आक्षेप प्राप्त झालेले नाहीत. तथापि आज रोजी उपस्थित नागरीक आपले आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक, यांनी सांगीतले की, आपण उपस्थित केलेल्या सूचना / आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू सुनावणीचे व्हिडिओ रेकॉर्डींग, चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पुढील कार्यवाहीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचेमार्फत केंद्र शासनास सादर करण्यांत येईल. त्यानंतर प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांना सादरीकरण सुरु करण्याची विनंती केली.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण करताना सांगितले की सातारा सांगली व सोलापूर जिल्ह्यातील वंचित १०९ गावामधील ४१००३ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्यासाठी जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडुन दि. ३०.०९.२०२३ रोजी ८ टिएमसी पाणी उपलब्धेतेस अंतिम मान्यता मिळालेली आहे. दरवर्षी येथील जनता दुष्काळाने त्रस्त आहे. या गावांना पाणी देणेबाबत लोकप्रतिनिधी व शेतक-यांची मागणी ही अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. सातारा सांगली व सोलापूर जिल्हयातील ९ तालुक्यातील १०९ गावातील ४१००३ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ देणे प्रस्तावित आहे.

सादरीकरणानंतर आयोजक, यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी कांही आक्षेप, सुचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले तसेच विचारण्यांत येणारे प्रश्न, शंका व सूचना या पर्यावरण विषयक बाबींशी निगडीत असाव्यात तसेच प्रश्न विचारण्यापूर्वी आपले नांव व गांव आवर्जून सांगण्याची विनंती केली. याची सदरील सुनावणीच्या इतिवृत्तांमध्ये आहे तशी नोंद घेतली जाईल.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक/प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे याबाबतची माहिति पुढीलप्रमाणे -**

| अ.क्र | नागरीकांचे नांव व गांव | मांडलेले मत |
|---|---|---|
| 1. | श्री. एन के हिप्परकर, प्राध्यापक वाळेखिंडी , ता. जत जि सांगली | पर्यावरणीय कोणाताही आक्षेप नाही. तसेच विस्तारीत टेंभू प्रकल्प पर्यावरण समृध्द करणारा आहे. |

| | | |
|---|---|---|
| 2. | श्री शंकर जनार्दन शिंदे (सेवानिवृत्त उपवि. अभि.) बेवनूर , ता. जत जि. सांगली | विस्तारीत प्रकल्पामध्ये बेवनूर गावाचा समावेश झाला असून कोणताही आक्षेप नाही.तसेच प्रस्तावित प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याची विनंती. |
| 3. | श्री. मोहन रंगराव जाधव, दहिवडी, जि. सांगली | दहिवडी नजीकची आठ गावे. अदयाप कोणतेही योजनेत नव्हती. आता समावेश झाला असून लवकरात लवकर योजना पूर्ण करावी. कोणताही आक्षेप नाही. तसेच प्रस्तावित प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याची विनंती. |
| 4. | श्री. दत्तू पांडूरंग वाघमोडे , गुलाबवाडी, जि. सांगली | गुलाबवाडीला यापूर्वी पाण्याचा थेंबही नव्हता. या योजनेमुळे लाभ झाला. कोणताही आक्षेप नाही. |
| 5. | श्री. श्रीकृष्ण बाबूराव पाटील, कॅप्टन, केरेवाडी ता. कवठेमहांकाळ | उर्वरीत पाईपलाईन पूर्ण करुन योजना पूर्ण करावी |
| 6. | श्री प्रमोद शिवाजी शेंडगे, पेड | पेड परिसरातील 5 वाडया सदर विस्तारीत प्रकल्पात समाविष्ठ असून पर्यावरणीय कोणताही आक्षेप नाही. |
| 7. | श्री प्रशांत उद्धव कुलकर्णी , सावलज | पर्यावरणीय कोणताही आक्षेप नाही. |
| 8. | श्री. शंकर निवृत्ती शिंदे, ग्रामपंचायत सदस्य बेनापूर | सर्व टप्प्यांची कामे लवकरात लवकर करावीत. तसेच बलवडी ते वाघोली शिरढोण पर्यंत पाणी सोडावे हि विनंती. पर्यावरणीय कोणताही आक्षेप नाही. |
| 9. | श्री. सागर रघुनाथ पवार, ग्रामपंचायत सदस्य ताडाची वाडी ता. खानापूर | खानापूर तालुक्यातील शेवटच्या दोन गावांना पाणी पोहोचले नाही. ते मिळावे. तसेच बाजूला बानूर गड , भूपालगड तसेच शुक्राचार्य मंदिर असल्याने योजनेमुळे कोणताही ऱ्हास होत नाही. |
| 10. | श्री शिवाजी शिंदे , माजी सभापती , जत पंचायत समिती , वाळेखिंडी | पर्यावरणीय कोणताही आक्षेप नाही. पर्यावरण समृध्द होईल. विस्तारीत प्रकल्पामुळे चारा छावण्यावर अवलंबून रहावे लागणार नाही. |
| 11. | श्री पंकज तानाजी पाटील, उपसरपंच, वायफळे | पर्यावरणीय कोणताही आक्षेप नाही. |
| 12. | श्री. अतुल पाटील, उपसरपंच जाखापूर, ता. कवठेमहांकाळ | आठ गावांचा समावेश विस्तारीत योजनेत असून त्यापासून कोणताही धोका नाही. |
| 13. | श्री. गजेंद्र श्रीमंत पिसे, लोकनियुक्त सरपंच आवळाई, पिसेवाडी, शेरनोली बृ . ग्रामपंचायत | आवळाई व पिसेवाडी येथे मोठे वनीकरण असल्याने मोठे टँक भरले तर उन्हाळयात फायदा होईल. |

| | | |
|---|---|---|
| 14. | श्री. हणमंत खिलारे, उपाध्यक्ष, खानापूर तालुका (भाजप) | स्टोन क्रशरची चौकशी करावी. (पर्यावरण सुनावणीशी संबंधीत नाही ) |
| 15. | श्री. आर जे पाटील, वायफळे | विस्तारीत प्रकल्प योजनेस अभिनंदन करुन शुभेच्छा आहेत. तसेच पर्यावरणीय कोणताही आक्षेप नाही.. |
| 16. | श्री. दाजी श्रीराम पवार, ऐनवाडी (अगस्त्यवाडी लोकनियुक्त सरपंच) | अगस्त्यवाडी पासून पुढे ऐनवाडी, ढोराळे, जाधववाडी, गोरेवाडी येथे पाणी सोडावे. आक्षेप नाही. |
| 17. | श्री धनाजी पाटील, रायवाडी, ता. कवठेमहांकाळ | वाखुर्डे ते रायवाडी तलावात ८०० एमएम व्यास असणारी पाईप टाकून महादेव खोरा येथे पाणी सोडावे. तसेच नागज मधून गेलेल्या कॅनॉलवरुन PDN ची लाईन टाकून निलेश माने यांचे शेताशेजारच्या बंधा-यात पाणी सोडावे. रायवाडी तलावातून ७ गावांना पाणी पिण्याची स्कीम असल्याने लवकरात लवकर योजना पूर्ण करावी. आक्षेप नाही. |
| 18. | श्री संदिप तात्या ठोंबरे , (भाजप उपाध्यक्ष) खानापूर | सदर विस्तारीत योजनेचा पर्यावरणावर कोणताही परिणाम होत नाही. पर्यावरणीय आक्षेप नाही. परंतु काही दुष्पपरिणाम होतील अशी भिती आपणास का वाटते याबद्दल खुलासा करावा. त्यावर श्री महेश मधुकर रासनकर ,कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग , सांगली यांनी स्पष्टीकरण दिले की, कोणतेही औदयोगिक प्रकल्पाकरिता किंवा सिंचन प्रकल्पांकरिता पर्यावरण , वन आणि जलवायू परिवर्तन मंत्रालय , भारत सरकार यांनी जारी केलेल्या पर्यावरण अधिसूचना 2006 व त्यातील सुधारण नुसार पर्यावरण विषयक जलसुनावणीची आवश्यकता असते. ही बाब कायदेशीर आहे. |
| 19. | श्री. संदिप शिवलींग माळी, सावळज ता. तासगांव जि सांगली | पर्यावरणीय कोणताही आक्षेप नाही. |
| 20. | श्री संजय लक्ष्मण पाटील, वडगांव , ता. तासगांव , जि. सांगली | पाणी लवकर सोडावे. तसेच आक्षेप नाही. |

सदर सुनावणीस उपथित माननीय खासदार श्री. संजयकाका पाटील, विधानसभा सदस्य श्री.गोपिचंद पडळकर व इतर मान्यवर लोकप्रतिनिधी तसेच उपस्थित सर्व नागरीक यांनी एकमताने हात

उंचावून सदर प्रकल्पास पाठिंबा/मान्यता दर्शवून सदरचा सिंचन प्रकल्प लवकरांत लवकर पूर्ण करण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत अशी विनंती केली.

त्यानंतर मा. डॉ राजा दयानिधी, अध्यक्ष तथा जिल्हा दंडाधिकारी यांनी सांगीतले की, विस्तारीत टेंभू प्रकल्पाचे बाबतीत काही पर्यावरणाशी संबंधीत नकारात्मक बाजू आहे किंवा कसे याबाबत जनतेकडून मत जाणून घेणे हा या जनसुनावणीचा मुख्य हेतू आहे. तसेच ही एक कायदयानुसार केलेली तरतूद आहे असे मत मांडले. त्यामुळे दोन्ही विभागांनी लवकरात लवकर इतिवृत्त तयार करुन पर्यावरणाशी संबंधीत कोणतीही हरकत नाही असे गृहित धरुन पुढील कार्यवाही करणेचे निर्देश दिले.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व मान्यवर लोकप्रतिनिधी, उपस्थित नागरीक, शासकीय अधिकारी, वृत्तपत्राचे प्रतिनिधी, पोलिस प्रशासन यांचे आभार मानुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने आजची जनसुनावणी संपल्याचे घोषित केले.

सदरच्या सुनावणीची कार्यवाही सकाळी ११.०० वाजता सुरू होऊन दुपारी १.३० वाजता संपन्न झाली.

**( नवनाथ सं. अवताडे )**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली

**( जगन्नाथ शं. साळुंखे )**
सदस्य
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर

**( डॉ. राजा दयानिधी )**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा जिल्हा दंडाधिकारी , सांगली .